# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे-१
Phone No. - ०२०-२६१२३०६६/६७ Email: mscepune@gmail.com Website: www.mscepune.in

**कालमर्यादित** जा.क्र.मरापप/वि.से.प्र.प/२०२०/1072
**अधिसूचना** दि. 27 /०२/२०२०
**प्रसिध्दी - संकेतस्थळावर**

प्रति,

मा. आयुक्त (शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,
पुणे-१.

**विषय:-** विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षा २०२० अधिसूचना
परीक्षा दिनांक २१ एप्रिल २०२० ते २३ एप्रिल २०२०
१) लिपिक/लिपिक तथा टंकलेखक/टंकलेखक पदांसाठी सेवा प्रवेशोत्तर परीक्षा
२) पर्यवेक्षक पदासाठी अर्हता परीक्षा.
३) सहाय्यक शिक्षण उपनिरिक्षक व त्या संवर्गातील समकक्ष पदावरील कार्यरत अधिकाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा.

महोदय,

उपरोक्त विषयामध्ये नमूद केलेल्या तिनही संवर्गाची विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षा दिनांक २१ एप्रिल २०२० ते २३ एप्रिल २०२० या कालावधीत घेण्यात येणार आहे. आपल्या कार्यालयातील आणि आपल्या अधिकार क्षेत्रातल्या दुय्यम कार्यालयातील शासन अधिसूचना क्र.इएक्सएम/१२६४/सी. दिनांक. ३०.०७.१९७३ मधील परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या नियमांनुसार लिपिक/लिपिक तथा टंकलेखक/टंकलेखक संवर्गातील परीक्षेस बसण्यास पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी, पर्यवेक्षकीय पदासाठी अर्हता परीक्षेस पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यानी तसेच आपल्या कार्यालयातील जे कर्मचारी शासन अधिसूचना क्र.एमईएस/१०७४/५२८/II-XIV दिनांक २०/०२/१९८० नुसार "सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक" व समकक्ष पदावरील संवर्गासाठी परीक्षेस बसण्यास पात्र आहेत. अशा सर्व उमेदवारानी परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर दि. ०१/०३/२०२० ते दि. १५/०३/२०२० पर्यंत ऑनलाईन आवेदनपत्रे भरावयाचे आहेत.

उपरोक्त संवर्गाची ऑनलाईन आवेदनपत्रे नियमानुसार विभागीय सेवा प्रवेशोत्तर परीक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांनी दिनांक १५/०३/२०२० पर्यंत भरावयाची आहेत. कोणत्याही कर्मचाऱ्यांची किंवा कार्यालयाची आवेदनपत्रे परस्पर / ऑफलाईन स्विकारली जाणार नाहीत. उपरोक्त तिनही संवर्गाच्या परीक्षेसंबंधी सर्वसाधारण माहिती पुढे देण्यात आली आहे.

अनुत्तीर्ण परीक्षार्थीबाबत त्यांनी यापूर्वी किती संधी घेतलेल्या आहेत याची स्वतंत्र यादी कार्यालयीन प्रमुखाच्या स्वाक्षरीने सादर करावी. याबाबत उपरोक्त उल्लेखित अधिसूचनांच्या नियमानुसार कार्यवाही करावी.

१) **लिपिक/लिपिक तथा टंकलेखक/टंकलेखक पदांसाठी सेवा प्रवेशोत्तर परीक्षा :-** शासन अधिसूचना क्र.इएक्सएम/१२६४ सी.दिनांक ३०/०७/१९७३ मधील परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या नियमाप्रमाणे तसेच ज्या लिपिकांचे खात्यामार्फत प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे. (कनिष्ठ लिपिक व सरळ सेवेत निवड झालेले किंवा प्रौढ शिक्षण संचालनालयाकडून समायोजनाने वर्ग झालेले वरिष्ठ लिपिक सर्वांचे प्रशिक्षण

पूर्ण असणे आवश्यक आहे अशाच लिपिकांना) व तसेच जे लिपिक यापूर्वी झालेल्या परीक्षेस बसून अनुत्तीर्ण झालेले आहेत. अशा लिपिकांना या परीक्षेस बसता येईल. कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण पूर्ण झाले नसल्यास सदर लिपिक/लिपिक तथा टंकलेखक/टंकलेखक यांना परीक्षेस बसता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदर परीक्षेस उत्तीर्ण होण्यास प्रत्येक विषयात किमान ३५ गुण व एकूणात ४० टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. यापूर्वी परीक्षेस बसून अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना ज्या विषयात ५० किंवा त्याहून अधिक गुण मिळाले असतील त्यांना त्या विषयात सूट मिळू शकते. अशा उमेदवारांनी ऑनलाईन आवेदनपत्रात तसे नमूद करुन त्या वर्षाच्या गुणपत्रकांची प्रत upload करणे आवश्यक आहे. अन्यथा परीक्षार्थी सर्व विषयात बसू इच्छितो असे गृहित धरले जाईल व त्याप्रमाणे निकाल जाहीर केला जाईल.

शासन नियमानुसार पात्र व्यक्तींचीच ऑनलाईन आवेदनपत्रे भरुन घ्यावीत. या **परीक्षेसाठी कर्मचारी पात्र आहेत याची पडताळणी करण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक /नियुक्ती अधिकारी यांची राहील.**

२) **पर्यवेक्षकीय पदासाठी अर्हता परीक्षा** :-शासन अधिसूचना क्र.इएक्सएम/१२६४/सी, दि. ३०/०७/१९७३ मध्ये नमूद केलेल्या नियमाप्रमाणे व सध्या मुख्य लिपिक पदावर काम करणारे तसेच यापूर्वी परीक्षेस बसून अनुत्तीर्ण झालेले या संवर्गातील कर्मचारी या परीक्षेसाठी पात्र आहेत.

सदर परीक्षेस उत्तीर्ण होण्यास प्रत्येक विषयात किमान ४० गुण व एकूणात ५० टक्के गुण आवश्यक आहेत. यापूर्वी परीक्षेस बसून अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना ज्या विषयात ६० किंवा त्याहून अधिक गुण मिळाले असतील त्या विषयात त्यांना सूट मिळू शकते. अशा उमेदवारांनी ऑनलाईन आवेदनपत्रात तसे नमूद करुन त्या वर्षाच्या गुणपत्रकांची प्रत upload करणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवार सर्व विषयात बसू इच्छितो असे गृहित धरले जाईल याची स्पष्ट जाणीव संबंधित उमेदवारांना देण्यात यावी.

शासन नियमानुसार पात्र व्यक्तींचीच ऑनलाईन आवेदनपत्रे भरुन घ्यावीत. या **परीक्षेसाठी कर्मचारी पात्र आहेत याची पडताळणी करण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक /नियुक्ती अधिकारी यांची राहील.**

३) **महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग III (प्रशासन शाखा) तथा सहाय्यक शिक्षण उपनिरिक्षक व त्या संवर्गातील समकक्ष पदावरील कार्यरत अधिकाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा:-** आपल्या कार्यालयातील आणि आपल्या अधिकार क्षेत्रातील शिक्षण विभागातील जी दुय्यम कार्यालये आहेत त्यातील जे कर्मचारी शासन अधिसूचना क्र.एमईएस/१०७४/५२८/II-XIV दिनांक २०/०२/१९८० नुसार सहाय्यक शिक्षण उपनिरिक्षक व समकक्ष संवर्गातील अधिकारी या परीक्षेस बसण्यास पात्र आहेत.

शासन अधिसूचना क्र.एमईएस/१०७४/५२८/II-XIV दिनांक २०/०२/१९८० अन्वये त्या संवर्गातील जे कर्मचारी परीक्षेस बसण्यास पात्र आहेत त्यांना नियमित म्हणून तसेच जे कर्मचारी यापूर्वी परीक्षेस बसून अनुत्तीर्ण झालेले आहेत अशा कर्मचाऱ्यांना या परीक्षेस बसता येईल.

शासन नियमानुसार पात्र व्यक्तींचीच ऑनलाईन आवेदनपत्रे भरुन घ्यावीत. या **परीक्षेसाठी कर्मचारी पात्र आहेत याची पडताळणी करण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक /नियुक्ती अधिकारी यांची राहील.**

सदर परीक्षेस उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक विषयात किमान ४५ गुण मिळणे आवश्यक आहे. यापूर्वी परीक्षेस बसून जे उमेदवार अनुत्तीर्ण झालेले आहेत परंतु त्यांना एखाद्या विषयात ६० किंवा त्याहून अधिक गुण मिळालेले असतील तर त्या विषयात त्यांना सूट मिळू शकेल. अशा उमेदवारांनी ऑनलाईन आवेदनपत्रात तसे नमूद करुन त्या वर्षाच्या गुणपत्रकाची प्रत upload करणे आवश्यक आहे. अन्यथा उमेदवार सर्व विषयास बसू इच्छित आहे असे गृहित धरुन त्यानुसार निकाल जाहीर करण्यात येईल.

जे विषय पुस्तकांसहित लिहावयाचे आहेत, त्यासाठी आवश्यक असणारी पुस्तके/त्यांच्या प्रमाणित छायांकित प्रती (फक्त शासकीय प्रकाशने) परीक्षार्थींनी परीक्षेच्या दिवशी स्वत: आणावयाची आहेत, याची स्पष्ट जाणीव त्यांना देण्यात यावी.

- **आवेदनपत्रे भरण्याची मुदत :-** सदर तीन संवर्गाच्या परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या पात्र उमेदवारांनी संबंधित मा. शिक्षण संचालक / विभागीय शिक्षण उपसंचालक (नियुक्ती अधिकारी) यांचेमार्फत परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर दि.०१/०३/२०२० ते दि.१५/०३/२०२० पर्यंत ऑलनाईन आवेदनपत्रे भरावयाचे आहेत. कोणत्याही कर्मचाऱ्यांची किंवा कार्यालयाची आवेदनपत्रे परस्पर / ऑफलाईन स्विकारली जाणार नाहीत.
- **परीक्षा शुल्क :-** तीनही संवर्गाच्या परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या पात्र उमेदवारांनी परीक्षा शुल्क रु.५००/- (रुपये पाचशे) ऑनलाईन भरावयाची आहे.
- **माध्यम :-** सदर परीक्षेचे सर्व विषयांसाठी माध्यम मराठी राहील.
- **प्रवेशपत्रे :-** ऑनलाईन फॉर्म व शुल्क भरलेल्या उमेदवारांची प्रवेशपत्रे परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर परीक्षा पूर्वी १० दिवस अगोदर उपलब्ध होतील. सदर प्रवेशपत्रे काढून घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारांची असेल.

**आपला विश्वासू,**

**(तुकाराम सुपे)**

**आयुक्त,**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१.

**प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :-**

१) मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे-१
२) मा. संचालक, (माध्य.व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालय,मध्यवर्ती इमारत पुणे-१
३) मा. संचालक, शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, सदाशिव पेठ, पुणे-३०.
४) मा. शिक्षण संचालक (अल्प संख्यांक व प्रौढ शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१
५) मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, पुणे
६) मा. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, डॉ. स. ना. रोड जे. जे. स्कूल ऑफ आर्टस कपांऊंड, मुंबई ४००००१.
७) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)

यांना माहितीस्तव व आपल्या अखत्यारितील कार्यालयातील उपरोक्त संवर्गातील कर्मचाऱ्यांना सदर परीक्षेची माहिती देण्याकरिता अग्रेषित.

**सोबत: परीक्षेचे वेळापत्रक व अभ्यासक्रम**

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१.

## शिक्षण विभागातील व कला विभागातील
## लिपिक/लिपिक तथा टंकलेखक/टंकलेखक पदासाठी सेवा प्रवेशोत्तर परीक्षा -२०२०

# वेळापत्रक

**(शासन अधिसूचना क्र. EXM/१२६४-C दि. ३०.०७.१९७३ अन्वये)**

| अ.क्र. | दिनांक व वार | वेळ | विषय | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | २१/०४/२०२० मंगळवार | सकाळी ११.०० ते १४.०० | **पेपर क्र. १** C-१ कार्यालयीन व्यवस्थापन (पुस्तकांशिवाय) | १०० |
| | | दुपारी १५.०० ते १८.०० | **पेपर क्र. २** C-२ कार्यालयीन पध्दती, टिपण्णी व मसुदा लेखन (पुस्तकांशिवाय) | १०० |
| २ | २२/०४/२०२० बुधवार | सकाळी ११.०० ते १४.०० | **पेपर क्र. ३** C-३ सर्वसाधारण व्याप्तीचे नियम व नियमावली (पुस्तकांशिवाय) | १०० |
| | | दुपारी १५.०० ते १८.०० | **पेपर क्र. ४** C-४ शिक्षण खात्याचे नियम व विनियम (पुस्तकांसह) | १०० |
| | | | **पेपर क्र. ४** C-४ Arts कला खात्याचे नियम व विनियम (पुस्तकांसह) | १०० |
| ३ | २३/०४/२०२० गुरुवार | सकाळी ११.०० ते १४.०० | **पेपर क्र. ५** C-५ शिक्षण विभागाचे व्यवस्थापन (पुस्तकांशिवाय) | १०० |
| | | | **पेपर क्र. ५** C-५ Arts कला विभागाचे व्यवस्थापन व यंत्रणा वगैरे (पुस्तकांशिवाय) | १०० |

(तुकाराम सुपे)
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१.

E:\Departmental Exam\2020\Adhisuchna

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१.

## शिक्षण विभागातील व कला विभागातील
## पर्यवेक्षकीय पदासाठी अर्हता परीक्षा -२०२०

# वेळापत्रक

**(शासन अधिसूचना क्र. EXM/१२६४-C दि. ३०.०७.१९७३ अन्वये)**

| अ.क्र. | दिनांक व वार | वेळ | विषय | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | २१/०४/२०२० मंगळवार | सकाळी ११.०० ते १४.०० | **पेपर क्र. १** S-१ कार्यालयीन व्यवस्थापन, नियंत्रण व शिस्त (पुस्तकांशिवाय) | १०० |
| | | दुपारी १५.०० ते १८.०० | **पेपर क्र. २** S-२ सर्वसाधारण व्याप्तीचे नियम व नियमावली भाग-१ (पुस्तकांसह) | १०० |
| २ | २२/०४/२०२० बुधवार | सकाळी ११.०० ते १४.०० | **पेपर क्र. ३** S-३ सर्वसाधारण व्याप्तीचे नियम व नियमावली भाग-२ (पुस्तकांसह) | १०० |
| | | दुपारी १५.०० ते १८.०० | **पेपर क्र. ४** S-४ शिक्षण विभागाचे नियम व विनियम (पुस्तकांसह) | १०० |
| | | | **पेपर क्र. ४** S-४ Arts कला खात्याचे नियम व विनियम (पुस्तकांसह) | १०० |

(तुकाराम सुपे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१.

E:\Departmental Exam\2020\Adhisuchna

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-१.

**(शिक्षण विभागातील)**

**महाराष्ट्र शिक्षण सेवा वर्ग III (प्रशासन शाखा) तथा सहाय्यक शिक्षण उपनिरिक्षक व त्या संवर्गातील समकक्ष पदावरील कार्यरत अधिकाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा - २०२०**

## वेळापत्रक

**(शासन अधिसूचना क्र. MES १०७४/५२८/II-XIV दि. २०.०२.१९८० अन्वये)**

| अ.क्र. | दिनांक व वार | वेळ | विषय | गुण |
|---|---|---|---|---|
| १ | २१/०४/२०२० मंगळवार | सकाळी ११.०० ते १४.०० | **पेपर क्र. १** AD-१ प्रचलित शैक्षणिक प्रश्न (पुस्तकांशिवाय) | १०० |
| | | दुपारी १५.०० ते १८.०० | **पेपर क्र. २** AD-२ शिक्षण खात्याचे नियम (पुस्तकांशिवाय) | १०० |
| २ | २२/०४/२०२० बुधवार | सकाळी ११.०० ते १४.०० | **पेपर क्र. ३** AD-३ सेवा नियम (पुस्तकांसह) | १०० |
| | | दुपारी १५.०० ते १८.०० | **पेपर क्र. ४** AD-४ लेखा व आर्थिक पद्धती (पुस्तकांसह) | १०० |

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त,**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-१.

E:\Department Exam\2020\Adhisuchna